FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED
*(A Government of Maharashtra Enterprise)*

प्रशा/आस्था-१/न.क्र.५८१/प्र.क्र.६१५/२०२५-२६/ 1962 दिनांक 21 AUG 2025

# आदेश

विषय :- मंजूर आकृतीबंधाचे अनुषंगाने नाशिक प्रदेशात अतिरिक्त झालेल्या वनपाल यांचे आंतरप्रदेश स्थानांतरण व पदस्थापना.

संदर्भ:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एफडीसी-२०२२/प्र.क्र.१४१/फ-५, दि.०९/०६/२०२५
२) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/आस्था-१/न.क्र.७१/प्र.क्र.१२५/१२१४, दि. २४/०६/२०२५
३) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/आस्था-१/न.क्र.५८१/प्र.क्र.६१५/१७१६, दि. २९/०७/२०२५
४) प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश यांचे पत्र क्र.प्राव्य/नाप्रना/आस्था/२०२५-२६/८२५ दिनांक १९/०८/२०२५
५) या कार्यालयाचे आदेश क्र.प्रशा/आस्था/न.क्र.४८/प्र.क्र.३७८२/१७१८ दिनांक २९.०७.२०२५
६) या कार्यालयाचे आदेश क्र.प्रशा/आस्था/न.क्र.४८/प्र.क्र.३७८२/१८५४ दिनांक १२.०८.२०२५
७) या कार्यालयाचे आदेश क्र.प्रशा/आस्था/न.क्र.२१०/४५७१ दिनांक २८.०३.२०२३

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये एफडीसीएम लिमिटेड मधील पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून एकूण १३५१ पदांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. मंजूर आकृतीबंधाचे अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये प्रदेश/ विभागवार पदांचे वाटप करण्यात आले आहे.

प्रदेशनिहाय **वनपरिक्षेत्र अधिकारी** यांचे खालीलप्रमाणे मंजूर, भरलेली व रिक्त पदे आहेत.

| अ.क्र. | प्रदेश | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | 13 | 9 | **4** |
| २ | नागपूर | 32 | 25 | **7** |
| ३ | चंद्रपूर | 31 | 30 | **1** |
| ४ | व्य.सं.कार्यालय | 4 | 3 | **1** |

प्रदेशनिहाय **वनपाल** यांचे खालीलप्रमाणे मंजूर, भरलेली व अतिरिक्त पदे आहेत.

| अ.क्र. | प्रदेश | मंजूर पदे | भरलेली पदे | अतिरिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | 40 | 53 | **13** |
| २ | नागपूर | 82 | 83 | **1** |
| ३ | व्य.सं.कार्यालय | 0 | 1 | **1** |

२.० मंजूर आकृतीबंधानुसार नाशिक प्रदेशात वनपाल संवर्गाची १३ पदे, नागपूर प्रदेशात १ पद व व्यवस्थापकीय संचालक कार्यालयात १ पद अतिरिक्त झालेले आहेत. त्यामुळे मंजूर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त झालेल्या वनपाल संवर्गातील पदांचे वेतन व भत्ते अदा करण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे.



**Registered Office :** FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
**CIN:**U45200MH1974SGCO17206 **PAN:** AAACF2982K **GST No.** 27AAACF2982K1ZD
**Ph.No.** 0712-2811905 **E-mail:**md@fdcm.nic.in,gmhqnag12@gmail.com **Website:** www.fdcm.co.in

३.० या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील ११ पदे तात्पूरत्या स्वरुपात अवनत करुन वनपाल संवर्गात सामावून घेण्यात आले आहे.

४.० नाशिक प्रदेशातील श्री एन.के. केणी, वनपरिक्षेत्र अधिकारी हे दि. ३१/०७/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच चंद्रपूर प्रदेशातील श्री ए.आर. अजेस्त्र, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचा दि. ३१/०७/२०२५ रोजी राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे नाशिक प्रदेशात १ व चंद्रपूर प्रदेशात १ रिक्त झालेले वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाचे २ पदे तात्पूरत्या स्वरुपात अवनत करुन सदर रिक्त पदावर नाशिक प्रदेशात अतिरिक्त झालेल्या २ वनपालांना सामावून घेण्यात येत आहे.

५.० गोरेवाडा प्राणी संग्रहालयात कार्यरत ०५ कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात आलेली असल्याने कामाची निकड लक्षात घेता या कार्यालयाचे पत्र क्र.५ व ६ अन्वये कर्मचाऱ्यांची पदस्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये भांडारपाल व लेखा सहाय्यक या पदावर एफडीसीएम मधील कार्यरत कर्मचाऱ्यांची तात्पुरती पदस्थापना करण्यात आलेली होती. तसेच या कार्यालयाचे दिनांक २८.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील काही पदे वनविभागास परत करण्यात आली होती. परंतु गोरेवाडा प्राणी संग्रहालय मध्ये आफ्रिकन सफारी व इतर अनुषंगीक कामांची व्याप्ती वाढलेली आहे. उक्त प्रमाणे नमुद बाब विचारात घेता वरीलप्रमाणे १३ वनपालांना सामावून घेतल्यानंतर अतिरिक्त ठरलेल्या नाशिक प्रदेशातील उर्वरित २ वनपालांना विशेष बाब म्हणून वनरक्षक पदावर पदावनत न करता गोरेवाडा प्राणी संग्रहालय, नागपूर येथे वनपाल पदाचे समकक्ष भांडार पाल व लेखा सहाय्यक या पदावर वनपाल संवर्गात रिक्त पदे निर्माण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थानांतरण व पदस्थापना करण्यात येत आहे.

६.० नाशिक प्रदेशातील सर्व विभागांचे व्यवस्थापन आराखडे २०२६ मध्ये संपुष्टात येत असल्याने नविन आराखडे तयार करणेसाठी PMPR मंजूर करणे संदर्भात दिनांक २३/०७/२०२५ रोजी Standing Consultative Committee ची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेमध्ये समितीच्या सदस्यानी पुणे वन प्रकल्प विभागातील क्षेत्र वनविभागास हस्तांतरीत करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार पुणे वन प्रकल्प विभाग वेगळा न राहता पुणे वन प्रकल्प विभागातील यवत परिक्षेत्राचे वनक्षेत्र अत्यल्प असल्याने सदर क्षेत्र, ठाणे वन प्रकल्प विभागास संलग्न करुन ठाणे वन प्रकल्प विभागाचा, उप वन प्रकल्प विभाग म्हणून प्रस्तावित करण्यात आले आहे. ठाणे वन प्रकल्प विभागासंदर्भात Standing Consultative Committee च्या सदस्यांनी या विभागातील वाणिकी कामास अयोग्य असलेले क्षेत्र हस्तांतरीत करण्याबाबत कारवाई सुरू करण्यात आलेली होती. परंतु आजतागायत असे क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यात आले नसल्याने हस्तांतरणाबाबत पुनश:च विचार करण्यात यावा असे नमुद केले आहे. तसेच नाशिक वन प्रकल्प विभागातील क्षेत्र वनविभागास हस्तांतरीत करण्याच्या संदर्भात मा.श्री नितिन अर्जुन पवार, विधानसभा सदस्य, यांच्याकडील प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी नाशिक वन प्रकल्प विभागातील क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्याची शासनास शिफारस केली आहे. त्यामुळे नाशिक प्रदेशातील मंजूर पदाची आवश्यकता भासणार नाही.

७.० सबब, चंद्रपूर प्रदेशात सध्या चंदन वनिकरण बल्लारपुर, तडाली फर्निचर युनिट, मार्खंडा अगरबत्ती प्रकल्प, बांबु वनिकरण, WCL करीता ACA वनिकरण, गांडुळ खत प्रकल्प, अशी नाविन्यपूर्ण प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असल्याने कामाची निकड लक्षात घेता वनपाल संवर्गातील पदांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | प्रदेश | वनपरिक्षेत्र संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरूपात अवनत केल्याने वनपाल संवर्गातील अतिरिक्त वाटप होणारी पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | ५ | नाशिक प्रदेशातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे रिक्त पदे तात्पूरत्या स्वरुपात अवनत करुन वनपाल संवर्गात नागपूर व चंद्रपूर प्रदेशात वाटप. |
| २ | चंद्रपूर | ६ | |
| ३ | नाशिक | ० | |



**Registered Office** : FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
CIN:U45200MH1974SGCO17206 **PAN**: AAACF2982K **GST No.** 27AAACF2982K1ZD
**Ph.No.** 0712-2811905 **E-mail**:md@fdcm.nic.in,gmhqnag12@gmail.com **Website:** www.fdcm.co.in

८.० प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांनी नाशिक प्रदेशात कनिष्ठतम वनपाल ज्यांनी त्यांचे रूजु दिनांकापासुन नाशिक प्रदेशात १२ ते १४ वर्षापासुन काम केले आहे अश्या वनपालांची यादी संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये सादर केली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे वनपाल यांना प्रदेश वाटप करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वनपाल यांचे नाव | कार्यरत वन प्रकल्प विभाग | स्थानांतरणानंतर पदस्थापनेचा प्रदेश |
|---|---|---|---|
| १ | श्री ए. एल. कोळी | नाशिक | चंद्रपूर प्रदेश |
| २ | श्री यु. जी. बतुलवार | ठाणे | चंद्रपूर प्रदेश |
| ३ | श्रीमती एम. जे. साळुंके | ठाणे | नागपूर प्रदेश |
| ४ | श्री जी. टी. राठोड | पुणे | नागपूर प्रदेश |
| ५ | श्री जे. डी. धनगर | ठाणे | चंद्रपूर प्रदेश |
| ६ | श्री सी. एस. मोरे | पुणे | नागपूर प्रदेश |
| ७ | श्री बी. बी. गायकवाड | नाशिक | चंद्रपूर प्रदेश |
| ८ | श्रीमती व्ही. एस. बहिरम | नाशिक | नागपूर प्रदेश |
| ९ | श्रीमती व्ही. एस. मोराळे | ठाणे | नागपूर प्रदेश |
| १० | श्री एस. व्ही. सोनवणे | ठाणे | चंद्रपूर प्रदेश |
| ११ | श्री एस. जी. शिरसाठ | ठाणे | चंद्रपूर प्रदेश |
| १२ | श्री डी. पी. पवार | नाशिक | भांडारपाल, गोरेवाडा प्रकल्प, नागपूर |
| १३ | श्रीमती के. एस. पाटील | नाशिक | लेखा सहाय्यक, गोरेवाडा प्रकल्प, नागपूर |

९.० प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपूर / नागपूर प्रदेश यांनी उक्त वनपाल यांचे पुढील पदस्थापनेचे आदेश त्यांचे स्तरावरुन विनाविलंब निर्गमित करावे. प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश, नाशिक यांनी तात्काळ संबंधित वनपाल यांना कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी व वनपाल यांना आवंटीत प्रदेशात रुजू होणे करीता निर्देश देण्यात यावे.

१०.० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येईल.

११.० नियंत्रक अधिकारी यांनी अनुपालन अहवाल सत्वर सादर करावा.

21/8/25

(नरेश झुरमुरे)
**व्यवस्थापकीय संचालक**

प्रति,
प्रादेशिक व्यवस्थापक, (सर्व)
एफडीसीएम लिमिटेड,

**प्रतिलिपी:- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी गोरेवाडा झू लिमिटेड, नागपूर
२) विभागीय व्यवस्थापक, संबंधित (सर्व)
३) विभागीय व्यवस्थापक, गोरेवाडा प्रकल्प नागपूर.
४) वरीलप्रमाणे संबंधित वनपाल (सर्व)
५) आदेश फाईल.
६) एफडीसीएम संकेत स्थळ www.fdcm.co.in



**Registered Office** : FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
**CIN:**U45200MH1974SGCO17206 **PAN:** AAACF2982K **GST No.** 27AAACF2982K1ZD
**Ph.No.** 0712-2811905 **E-mail:**md@fdcm.nic.in,gmhqnag12@gmail.com **Website:** www.fdcm.co.in